महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)
CIN:U४०१०९MH२००५HGC१५३६४५
मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, ४ था मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
वेबसाइट :- www.mahadiscom.in ई-मेल:- agmhrmprcell@gmail.com

क्र.मासं/मपुक/०१९४०३ दिनांक: १३.०६.२०२५

**मपुक कार्यालयीन आदेश क्र.-४०/२०२५**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कर्मचारी सेवाविनियम अनुसूची क्र.एक अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संचालक (वित्त), संचालक ( संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) व संचालक (मासं) यांचेशी विचार विनिमय करुन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी खालील बाबींस मंजूरी दिली आहे.

१. **सांघिक कार्यालयाच्या आस्थापनेवरती कार्यकारी संचालक (वाणिज्य) यांच्या नियंत्रणा खाली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०) या योजनेसाठी कक्षाची निर्मिती करणे.**

२. **सांघिक कार्यालयाच्या आस्थापनेवरती कार्यकारी संचालक (वाणिज्य) यांच्या नियंत्रणा खाली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०) या कक्षामध्ये तक्ता-'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे ०१ अधिक्षक अभियंता (वितरण), ०१ उपकार्यकारी अभियंता (वितरण), ०४ सहाय्यक अभियंता (वितरण) अशी एकूण ०६ पदे निर्माण करणे. सदर ०६ पदांपैकी ०१ अधिक्षक अभियंता (वितरण) व ०१ उपकार्य अभियंता (वितरण) ही दोन्ही पदे सांघिक कार्यालयाच्या अतिरिक्त पदांच्या संचयनीमधून वळती करणे व उर्वरित सहाय्यक अभियंता (वितरण) ची एकूण ०४ पदे ही प्रत्येकी ०१ याप्रमाणे सहव्यवस्थापकीय संचालक कार्यालय, कल्याण व छत्रपती संभाजीनगर तसेच प्रादेशिक कार्यालय, पुणे व नागपूर यांच्या आस्थापनेवरुन वळती करणे.**

सदर आदेश महावितरण कंपनीच्या Employee Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

CamScanner

**सांघिक कार्यालयाच्या आस्थापनेवरती कार्यकारी संचालक (वाणिज्य) यांच्या नियंत्रणा खाली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०) या कक्षामध्ये मंजूर केलेली पदे**

**तक्ता-'अ'**

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पदसंख्या | वळती करण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|
| १ | अधिक्षक अभियंता (वितरण) | ०१ | सांघिक कार्यालयाच्या अतिरिक्त पदांच्या संचयनी मधून वळती करणे. |
| २ | उपकार्यकारी अभियंता (वितरण) | ०१ | सांघिक कार्यालयाच्या अतिरिक्त पदांच्या संचयनी मधून वळती करणे. |
| ३ | सहाय्यक अभियंता (वितरण) | ०४ | सहाय्यक अभियंता (वितरण) ची एकूण ०४ पदे ही प्रत्येकी ०१ या प्रमाणे सहव्यवस्थापकीय संचालक कार्यालय कल्याण व छत्रपती संभाजीनगर तसेच प्रादेशिक संचालक कार्यालय पुणे व नागपुर मधून वळती करणे. |
| | **एकूण** | **०६** | |

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

CamScanner